ePaper

उद्धव ठाकरे अन् एकनाथ शिंदे एकत्र येऊ शकतात; प्रताप सरनाईक

| वर्ष - 8 | अंक - 342 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

आतील पानांत
- चौथ्या कसोटीतून आकाशदीप बाहेर!
- बीसीसीआयने 'हा' बदल करायलाच हवा!
- बनके कृष्ण, अब किसी को आना होगा!
- दोन भावांचा एकाच मुलीशी विवाह

www.mahaenews.com | सोमवार, दि. 21 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## छावा कार्यकर्ता मारहाण प्रकरण तापलं

# नांदेडमध्ये टायर जाळून आंदोलन!

## लातूरमध्ये सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्ते फेकले

| नांदेड | प्रतिनिधी | महाईन्यूज

**लातूरमध्ये राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मारहाण केली होती. आता या घटनेचे प्रसाद नांदेडमध्ये सुद्धा उमटले असून येथे आंदोलन करण्यात आले आहे. लातूरमध्ये सुनील तटकरे यांच्या पत्रकार परिषदेत छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी पत्ते फेकून माणिकराव कोकाटे यांच्या रम्मी खेळाबाबत जाब विचारला होता. त्यानंतर राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना मारहाण केली होती. आता या घटनेचे पडसाद नांदेडमध्ये सुद्धा उमटत आहेत.**



नांदेडमध्ये मराठा चळवतील कार्यकर्त्यांनी एकत्र येत रहदारीचे ठिकाण असलेल्या जिल्हा परिषद कॉम्प्लेक्स समोर चक्क रस्त्या च्या मधोमध टायर जाळून आंदोलन केले. यावेळी पदाधिकाऱ्यांनी कृषिमंत्री माणिकराव कोकाटे व राष्ट्रवादीच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसची यात्रा जिल्ह्यात फिरू देणार नाही असा इशाराही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. त्यानंतर आंदोलन करणाऱ्या पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी अटक केली आहे.

याबाबत बोलताना दशरथ कपाटे यांनी म्हटले की, 'अजित दादांचा पक्ष हा सत्तेच्या मस्तीचा पक्ष आहे. शेतकरी नेते विजय घाडगे यांनी कृषी मंत्र्याचा व्हिडिओ सुनील तटकरे यांना दाखवून असा जर कृषिमंत्री असेल तर राज्यात शेतकऱ्यांच काय बोलणार आहे असा जबाब विचारला. तेव्हा सुरज चव्हाण यांनी गुंड बोलवून त्यांना मारहाण केली आहे. आता शेतकरी आणि मराठा समाज तुमची वाट लावल्याशिवाय राहणार नाही.



### चुकीच्या गोष्टीचे समर्थन करणार नाही – तटकरे

राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण यांनी छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्याला मारहाण केली. यावरच तटकरे यांनी नाराजी व्यक्त करताना म्हटले की, 'या मारहाणीत सूरज चव्हाण असतील तर ते चूक आहे. मी याचं कधीच समर्थन करणार नाही, योग्य ती कारवाई झालीच पाहिजे. मी आयुष्यात कधीही चुकीच्या गोष्टीचे समर्थन करणार नाही. छावा पदाधिकाऱ्याला मारहाण झाली ही चूक घडली. मी त्याबाबत नाराजी व्यक्त करतो.'

### नेमकं काय घडलं होतं?

कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे विधिमंडळात रमी हा गेम खेळतानाचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे.

या व्हिडीओनंतर विरोधकांकडून राज्य सरकारवर टीका केली जात आहे. विरोधकांनी तर या मुद्द्यावरून सरकारला चांगलंच घेरलंय. सुनील तटकरे यांनाही लातूरमध्येही अशाच विरोधाला तोंड द्यावे लागले. छावा संघटनेच्या एका पदाधिकाऱ्याने टेबलवर पत्ते टाकले आणि कृषीमंत्र्यांना हे द्या असं म्हटलं होते, त्यामुळे राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत त्या पदाधिकाऱ्याला बेदम मारहाण केली. तसेच शिवीगाळही केली.

### मारहाणीत सूरज चव्हाण असतील तर ते चूक आहे

विशेष म्हणजे मारहाण झालेल्या या व्हिडीओमध्ये राष्ट्रवादीचे प्रवक्ते सूरज चव्हाण हेदेखील छावा संघटनेच्या पदाधिकाऱ्याला मारताना दिसत आहेत. यावरच तटकरे यांनी नाराजी व्यक्त केली आहे. या मारहाणीत सूरज चव्हाण असतील तर ते चूक आहे. मी याचं कधीच समर्थन करणार नाही, असे तटकरे म्हणाले. तसेच मी शांततावादी कार्यकर्ता आहे. चर्चेतून देवाणघेवाणीतून अनेक प्रश्न सुटत असतात.

छावा संघटनेचे पदाधिकारी त्यांची प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी आले होते. मी त्यांची भावना शांततेने ऐकून घेतली, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

### त्याबाबत नाराजी व्यक्त करतो

सूरज चव्हाण या माराहाणीत असतील तर ते चुकीचेच आहे. मी याचे कधीही समर्थन करणार नाही. योग्य ती कारवाई झालीच पाहिजे. छावा पदाधिकाऱ्याला मारहाण झाली ही चूक घडली. मी त्याबाबत नाराजी व्यक्त करतो, अशी भूमिकाही तटकरे यांनी जाहीर केली.

# तीन दिवसानंतरही पाणीपुरठा विस्कळीत!

## आजपासून सुरळीत करण्यात येण्याचे पालिकेचे स्पष्टीकरण

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**पर्वती जलशुद्धीकरण केंद्र ते एसएनडीटीदरम्यान जलवाहिनीतील गळतीमुळे कोथरूड परिसरातील विस्कळीत झालेला पाणीपुरवठा रविवारी सलग तिसऱ्या दिवशीही कायम राहिला. मॉडेल कॉलनी, रेव्हेन्यू कॉलनी, स्टेट बँक कॉलनी, श्रमिक वसाहत, हॅपी कॉलनी, मेघदूत, तेजस नगर, डहाणूकर कॉलनी, सुतारदरा, किष्किंदानगर या भागांतील अनेक सोसायट्या, गृहसंकुलांना त्याचा फटका बसला. विस्कळीत, अपुऱ्या आणि कमी दाबाने पाणीपुरवठा झाल्याच्या अनेक तक्रारी स्थानिक नागरिकांकडून करण्यात आल्या.**




दरम्यान, जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले असून, सोमवारपासून कोथरूड परिसराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे स्पष्टीकरण महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता प्रसन्न जोशी यांनी दिले.पर्वती जलशुद्धीकरण केंद्र ते एसएनडीटी या जलवाहिनीमध्ये गळती होत असल्याचे शनिवारी (१९ जुलै) संध्याकाळनंतर उघडकीस आले होते. त्यानंतर पाणीपुरवठा विभागाने दुरूस्तीचे काम तातडीने हात घेतले. गळतीमुळे रविवारी (२० जुलै) एसएनडीटी केंद्राचा पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या केंद्रातून पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या कोथरूड, शिवाजीनगर, औंध तसेच कर्वेनगर परिसरातील रहिवाशांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागले. मात्र, गळतीमुळे शुक्रवार आणि शनिवारी, तर दुरुस्तीच्या कामांमुळे रविवारीही पाणीपुरवठा विस्कळीत झाला होता.'गुरुवारी (१७ जुलै) देखभाल-दुरूस्तीसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर शुक्रवारी संध्याकाळी कमी दाबाने पाणी आले. शनिवारी सकाळी जलवाहिनी फुटल्यामुळे पाणी येणार नसल्याचे सांगण्यात आले. तर, रविवारी संध्याकाळी सहाच्या सुमारास कमी दाबाने पाणी आले. तीन दिवस सुरळीत पाणीपुरवठा होत नसल्याने मोठा प्रश्न निर्माण झाला होता,' असे डाव्या भुसारी कॉलनीत राहणारे शैलेश केळसकर यांनी सांगितले.

अलीकडे या परिसराला पाणीपुरवठ्याचा प्रश्न सातत्याने भेडसावत आहे. देखभाल-दुरुस्तीसाठी पाणीपुरवठा बंद करूनही बिघाड दुरुस्त होत नाही. गेल्या शुक्रवारपासून पाणीपुरवठा विस्कळीत झाला. तो रविवारीही कामय राहिला. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. घरात पाणी नसल्याने रोजची सर्व कामे खोळंबली होती.नागरी वसाहत मोठ्या प्रमाणात वाढते आहे. त्या तुलनेत महापालिकेकडून पाणी, वीज अशा मूलभूत सुविधांची पूर्तता केली जात नाही. खडकवासला, वारजे परिसरात पाण्याचा प्रश्न सातत्याने भेडसावतो आहे.दरम्यान, जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले.

### एसएनडीटी जलवाहिनीमध्ये गळती

सोमवारपासून कोथरूड परिसराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल, असे स्पष्टीकरण महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचे अधीक्षक अभियंता प्रसन्न जोशी यांनी दिले.पर्वती जलशुद्धीकरण केंद्र ते एसएनडीटी या जलवाहिनीमध्ये गळती होत असल्याचे शनिवारी (१९ जुलै) संध्याकाळनंतर उघडकीस आले होते. त्यानंतर पाणीपुरवठा विभागाने दुरूस्तीचे काम तातडीने हात घेतले. गळतीमुळे रविवारी (२० जुलै) एसएनडीटी केंद्राचा पाणीपुरवठा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे या केंद्रातून पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या कोथरूड, शिवाजीनगर, औंध तसेच कर्वेनगर परिसरातील रहिवाशांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागले.

# गणेशोत्सव २४ तास भाविकांसाठी खुला!

## उत्सव काळात सार्वजनिक सेवा आणि उपाहारगृहे 24 तास खुली

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'गणेशोत्सवाला राज्य शासनाने 'राज्य महोत्सव' जाहीर केल्यानंतर यंदाचा गणेशोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी रूपरेषाही निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शहरातील गणेशोत्सव भक्तांसाठी २४ तास खुला राहावा; तसेच संपूर्ण निर्बंधमुक्त करावा, यासाठी सरकारकडे पाठपुरावा करणार आहे,' अशी माहिती कसबा विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार हेमंत रासने यांनी दिली.**



'राज्य सरकारकडून अनेक कार्यक्रम आणि भरघोस निधीची घोषणा करण्यात आल्याने आगामी उत्सव धुमधडाक्यात साजरा होईल,' असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. 'शहरातील गणेशोत्सव २४ तास खुला राहावा, धर्म, संस्कृती, परंपरा जपून उत्सव साजरा करणे, उत्सव काळात सार्वजनिक सेवा आणि उपाहारगृहे २४ तास खुली राहावीत, सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून पोलिसांची संख्या वाढवून निर्बंधमुक्त आणि भयमुक्त गणेशोत्सव साजरा करण्याला प्राधान्य राहील,' असे रासने यांनी सांगितले.कसबा मतदारसंघातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी शनिवार वाडा ते स्वारगेट आणि सारसबाग ते शनिवार वाडा असा भुयारी मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून या भुयारी मार्गाचा सविस्तर प्रकल्प आरखडा (डीपीआर) करण्याचे कामही अंतिम टप्प्यात आले आहे. एका महिन्याभरामध्ये याचे काम पूर्ण होऊन, पुढील प्रक्रियेला सुरुवात होईल, असा दावा रासने यांनी केला. तसेच, राजा दिनकर केळकर संग्रहालयाच्या विस्ताराला गती देण्यासही मान्यता मिळाल्याची माहिती त्यांनी दिली. ते म्हणाले, 'कसबा मतदारसंघात अभ्यासिकांच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षा देणारे हजारो विद्यार्थी अधिकारी होण्याचे स्वप्न पाहतात. परीक्षेची तयारी करताना त्यांना अनेकदा समस्यांना सामोरे जावे लागते. त्यातील एक म्हणजे आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षांचा निकाल वेळेवर न लागणे अथवा या निकालाच्या प्रक्रियेला विलंब होणे. या संदर्भात विधिमंडळाच्या अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती.'ऐतिहासिक परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाला 'राज्य उत्सव' म्हणून मान्यता देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड. आशिष शेलार यांनी त्याबाबतची घोषणा गेल्या काही दिवसांपूर्वी विधानसभेत केली होती. गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा द्यावा, अशी मागणी कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार हेमंत रासने यांनी केली .

### गणेशोत्सवासाठी रूपरेषाही निश्चित

होती. त्याला प्रतिसाद देऊन मंत्री शेलार यांनी त्याबाबतची घोषणा केली होती. तसेच, उत्सव अधिक भव्य स्वरूपात साजरा होण्यासाठी शंभर कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले होते.'गणेशोत्सवाला राज्य शासनाने 'राज्य महोत्सव' जाहीर केल्यानंतर यंदाचा गणेशोत्सव मोठ्या धुमधडाक्यात साजरा करण्यासाठी रूपरेषाही निश्चित करण्यात आली आहे.

## चाकण एमआयडीसी परिसरातील अवजड वाहनांमुळे

# अपघातांची समस्या गंभीर!

## 50 हजार अवजड वाहनांवर सहा महिन्यांत कारवाई

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: खालुंब्रे येथे गेल्या आठवड्यात कंटेनरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू झाल्याने औद्योगिक परिसरातील अवजड वाहनांमुळे निर्माण होणारी अपघातांची गंभीर समस्या पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. भरधाव ट्रक, डंपर, मिक्सर आणि कंटेनरमुळे दुचाकीसह इतर वाहनचालकांना कायमच जीव मुठीत घेऊन रस्त्याने ये-जा करावी लागत आहे. वाहतूक पोलिसांनी मागील सहा महिन्यांत ५० हजार ७१४ प्रकरणांमध्ये कारवाई करत तब्बल ६ कोटी ५७लाखांपेक्षा अधिक दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. तरीही अवजड वाहनांचे संकट काही केल्या दूर होताना दिसत नाही.**

### तब्बल 6 कोटी 57 लाखांपेक्षा अधिक दंड वसूल



> अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सातत्याने कारवाई केली जाते. अपघात रोखण्यासाठी वाहनचाल क आणि मालकांनीही जबाबदारीने वागायला हवे. कठोर कारवाईसह जनजागृतीही सुरू आहे. मागील सहा महिन्यांत वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ५० हजार ७१४ केसेस करण्यात आल्या आहेत.
>
> **-विवेक पाटील,** पोलीस उपायुक्त - पिंपरी-चिंचवड वाहतूक विभाग

चाकण औद्योगिक परिसरात खालुंब्रे येथे १४ जुलै रोजी सकाळी भरधाव कंटेनरने धडक दिल्याने दुचाकीस्वार गजानन बोळकेकर (वय २६, मूळ रा.- कंधार, जि. नांदेड) या तरुणाचा कंटेनरच्या चाकाखाली चिरडून मृत्यू झाला. या अपघाताचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर तरुणाचा छिन्नविछिन्न अवस्थेतील मृतदेह पाहून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. शहरातील औद्योगिक भागात मागील काही महिन्यांत अशाच प्रकारे अनेक तरुणांचे प्राण गेले आहेत. हिंजवडी आयटी पार्कमध्ये जानेवारी महिन्यात दोन तरुणी सिमेंट मिक्सरखाली चिरडल्या गेल्या होत्या. या सर्व अपघातांमागे बेशिस्तपणा हे एकच कारण समोर आले आहे.

चाकण, तळवडे, हिंजवडी, महाळुंगे औद्योगिक भागात ट्रक, डंपर, मिक्सर व कंटेनर धावत असतात. वाहतूक विभागाने सन २०२४ मध्ये ३७ हजार अवजड वाहनांवर कारवाई करून ४ कोटी २३ लाखांचा दंड वसूल केला होता. यंदा वर्षाच्या पहिल्या सहा महिन्यांत तब्बल ५० हजार ७१४ अवजड वाहनांवर कारवाई करत तब्बल ६ कोटी ५७ लाखांपेक्षा अधिक दंड आकारण्यात आला आहे.

### उपाययोजना करण्याची गरज

- अवजड वाहनांना ठराविक वेळेत (वर्दळ असताना) शहरात प्रवेशबंदी करावी.
- औद्योगिक वाहतुकीसाठी स्वतंत्र रस्ते तयार करावेत.
- रस्ते सुरक्षा झोनमध्ये पोलिसांची अधिक गस्त वाढवावी.
- वैद्यकीय व मानसशास्त्रीय चाचणी नियमित घ्यावी.
- सीसीटीव्ही व वाहन ट्रॅकिंग सिस्टिम कार्यान्वित करावी.

## नयनरम्य सोहळ्यात वैष्णव चिंब!

## सतरा वर्षांनंतर आळंदीमध्ये माऊली आणि तुकोबांच्या पालखीची भेट!

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून तुकाराम महाराजांची पालखी परतीच्या प्रवासात आळंदीमध्ये रविवारी आली. तब्बल 17 वर्षांनंतर हा योग जुळून आला संत शिरोमणी तुकाराम महाराजांच्या पालखीने माऊलींची भेट घेतली. हा नयनरम्य सोहळा अवघ्या वैष्णवांनी याची देही याची डोळा अनुभवला. रिमझिम पावसामध्ये अवघे वैष्णवजन या रम्य भेट सोहळ्यात न्हाऊन निघाले.**



### अशी आहे परंपरा

पूर्वी संत तुकाराम महाराज आळंदीत माउलींचे दर्शन घेऊन पंढरपूरला मार्गस्थ होत असे. त्यांच्या पश्चात त्यांचे पुत्र तपोनिधी नारायण महाराज यांनी पालखी सोहळा सुरू केला. १६८५ पासून देहूमधून संत तुकारामांच्या पादुका पालखीत ठेवून ते आळंदीत येत होते. नंतर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पादुका पालखीत घेत पुढे पंढरपुरला प्रस्थान करत होत्या. त्यानंतर ही परंपरा खंडित झाल्यावर गुरु हैबतबाबा आरफळकर यांनी १८३२ मध्ये स्वतंत्रपणे संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा सुरू केला. त्यानंतर दोन्ही संतांच्या पालखीचे मार्ग बदलले. दरम्यान २८ जुलै २००८ मध्ये तुकाराम महाराजांच्या ४०० व्या जन्मोत्सवावेळी तुकोबांचा पालखी सोहळा आळंदीमध्ये आणण्यात आला होता. तब्ब्ल १७ वर्षांनंतर पुन्हा एकदा जगद्गुरु तुकोबाराय आळंदीत आले. तुकोबांची पालखी आळंदीत मुक्कामी राहत आळंदीकरांचा पाहुणचार देखील घेतला.

संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव आणि संत तुकाराम महाराजांचा ३७५ वा वैकुंठगमन सोहळ्याचे औचित्य साधून तुकाराम महाराजांची पालखी परतीच्या प्रवासात आळंदीमध्ये आणावी असे आळंदी देवस्थानाकडून देहू देवस्थानला पत्राद्वारे निमंत्रण देण्यात आले होते. यापार्श्वभूमीवर देहू देवस्थानने आळंदीकरांचे हे निमंत्रण स्वीकारले.

जगद्गुरु संत तुकाराम महाराजांची पालखी रविवारी (दि. २०) आळंदीत माऊलींच्या भेटीला आली. तुकोबारायांचा पालखी सोहळा आळंदीत मुक्कामी राहत तुकोबांच्या पालखीने आळंदीकर यांचा पाहुणचार देखील स्वीकारला.

आळंदी देवस्थानचे सोहळा प्रमुख डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, देहू देवस्थानचे अध्यक्ष जालिंदर महाराज मोरे, दोन्ही संस्थांचे पदाधिकारी, मानकरी यावेळी उपस्थित होते. परंपरेप्रमाणे संत तुकाराम महाराज पालखीचे यावेळी स्वागत करण्यात आले. आळंदीतील नागरिकांसह आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांनी यावेळी दर्शनासाठी, तसेच भेटीचा रम्य सोहळा अनुभवण्यासाठी गर्दी केली होती.

# ना शेंडा, ना बुडखा...




**‘शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांनी वक्फ कायद्यातील सुधारणांशी संबंधित विधेयकावर कोणतीही भूमिका न घेता लोकसभेतून पळ काढला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेला मूठमाती दिल्यामुळेच ही पळापळ होते आहे.’**

रक्तरंजित फाळणीचीभयानक किंमत मोजूनच भारताला स्वातंत्र्य मिळाले. पाकिस्तान उजळ माथ्याने इस्लामचा उदो उदो करू लागला, तेव्हा आपल्या देशातील नेतृत्वाने धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व अंगीकारले. यात वावगे काहीच नव्हते. परंतु या धर्मनिरपेक्षतेला मतलबी राजकारणाचा रंग लागला, तेव्हापासून परिस्थिती बिघडली. संविधानापुढे सर्व धर्म समान असले तरी काही धर्म ‘अधिक समान’ असल्याचे धोरण काँग्रेसने सतत राबवले. मुस्लीम समाजाकडे काँग्रेसने आपली कायमस्वरूपी मतपेढी म्हणूनच पाहिले. सर्वधर्म समभावाला छेद देणाऱ्या काँग्रेसच्या दांभिकपणाला आणि लांगूलचालनाला हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी कायम विरोध केला आणि नेहमीच ज्वलंत हिंदुत्वाची भूमिका घेतली. देशप्रेमी मुस्लीम बांधवांना शिवसेनाप्रमुखांचा कधीच विरोध नव्हता. तसे असते तर साबिरभाई शेख यांना शिवसेना-भाजप युतीच्या सरकारमध्ये मंत्रीपद मिळाले नसते. विद्यामान



सरकारमध्ये अब्दुल सत्तार यांनाही मंत्रीपद मिळाले नसते. आमचा विरोध आहे तो मतांसाठी विशिष्ट समाजाचे लांगूलचालन करण्याच्या धोरणाला. आतापर्यंत ज्वलंत हिंदुत्वाची भूमिका घेणाऱ्या उबाठा शिवसेनेची भूमिका गेल्या काही काळात बदलली आहे. नैसर्गिक मित्र भाजपची साथ सोडून उद्धव ठाकरे यांनी पक्ष काँग्रेस व राष्ट्रवादीच्या (शरद पवार गट) चरणी घातला, मुख्यमंत्रीपद मिळवले आणि महाराष्ट्राचा, मराठी माणसाचा अभिमान काँग्रेसकडे गहाण टाकला. हिंदुत्वाची भाषा करून मतांसाठी काँग्रेसमार्फत मुस्लिमांचे लांगूलचालन करताना उबाठा शिवसेनेची त्रेधातिरपीट उडते आहे. त्याचे एक ठळक आणि ठसठशीत उदाहरण म्हणजे केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात संसदेत मांडलेले वक्फ बोर्ड विधेयक. या विधेयकाला राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील (महाराष्ट्रातील महायुती) सर्व पक्षांनी पाठिंबा दिला. काँग्रेसच्या आघाडीतील सर्व पक्षांनी त्याला विरोध केला. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांनी वक्फ कायद्यातील सुधारणांशी संबंधित विधेयकावर कोणतीही भूमिका न घेता लोकसभेतून पळ काढला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेला मूठमाती दिल्यामुळेच ही पळापळ होत आहे. ‘धरलं तर चावतं आणि सोडलं तर पळतं’ अशी उबाठाची स्थिती झाली आहे. वक्फ बोर्डाच्या सुधारणांना पाठिंबा दिला तर लोकसभेत काही ठिकाणी विजय मिळवून देणारा मुस्लीम समाज नाराज होणार आणि विरोध केला तर आघाडीत बिघाडी होणार. त्यामुळे या विधेयकावर कोणतीही भूमिका न घेता उबाठाच्या खासदारांनी लोकसभेतून पळ काढला. कुस्ती सुरू होण्याआधी पोटऱ्या थोपटायच्या आणि कुस्तीची वेळ आली की पाठ दुखत असल्याचा बहाणा करून पळून जायचे, अशी वेळ उबाठावर वक्फ विधेयकाने आणली आहे.वक्फ बोर्ड आणि त्या बोर्डाच्या ताब्यातील अफाट जमिनी हा कायमच चर्चेचा विषय ठरत आला आहे. बहुतेकांना वक्फ ही भानगड काय आहे, हेच नीट माहीत नसते, आणि हे अज्ञान तसेच ठेवणे प्रदीर्घ काळ सत्तेवर असणाऱ्यांसाठी सोयीचे होते. ज्या व्यक्तीने पाच वर्षे इस्लामचे पालन केले आहे, अशा मुस्लीम व्यक्ती अगर समूहाने दान केलेली मालमत्ता म्हणजे वक्फ. इथवर हे मर्यादित नाही. अक्षरश: कुठलीही मालमत्ता ही ‘वक्फ’ची असल्याचे बोर्ड जाहीर करू शकते. वक्फच्या कारभारात कुणीही बिगरमुस्लीम व्यक्ती ढवळाढवळ करू शकत नाही. असे काही करणे म्हणजे थेट धार्मिक बाबींत हस्तक्षेप ठरतो. वक्फ बोर्ड कायद्यात २०१३ साली यूपीए सरकारने काही सुधारणा केल्या आणि अधिकच अधिकार प्रदान केले. त्यातून त्यांची मक्तेदारी अधिकच वाढत गेली. वक्फ बोर्डाकडे २००९ पर्यंत ४ लाख एकर जमीन होती, जी काही वर्षांत दुप्पट झाली. सध्या वक्फ बोर्डाकडे नऊ लाख एकरपेक्षा जास्त जमीन आहे. बोर्डाकडे असलेल्या आठ लाख ६६ हजार स्थावर मालमत्तांची किंमत सव्वा लाख कोटींपेक्षाही जास्त आहे.

## संपादकीय »

### मुलगी जाते जिवानिशी

***आजच्या मुलींच्या महत्त्वाकांक्षा समजून न घेता आपला पुरुषप्रधान अहंकार कुरवाळत बसणाऱ्या वृत्तीचे प्रतिनिधित्व करतात...***

ओडिशा आणि हरियाणा या दोन राज्यांमध्ये गेल्या १५ दिवसांमध्ये दोन तरुण मुलींच्या बाबतीत घडलेल्या घटना कमालीच्या अस्वस्थ करणाऱ्या आहेत. ओडिशामधील घटनेत बीएड् करणाऱ्या त्या अभागी मुलीचा विभागप्रमुखाकडून सतत छळ होत होता. त्याच्याकडून होणाऱ्या लैंगिक मागण्यांना कंटाळून तिने महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे तक्रारही केली होती. तक्रारीची दखल घेतली गेली नाही तर प्राचार्यांच्या केबिनसमोर आपण जीव देऊ असेही तिने लेखी दिले होते. तिच्या तक्रारीची दखल तर घेतली गेली नाहीच, उलट विभागप्रमुख आणि प्राचार्यांनी संगनमताने तिच्या पाठीशी इतर कोणी उभे राहणार नाहीत, अशीही व्यवस्था केली. आपल्या तक्रारीचा काहीच उपयोग होत नाही, या उद्विग्नतेतून तिने स्वत:वर पेट्रोल ओतून घेऊन जाळून घेतले.आत्महत्या हा काही कोणत्याही प्रश्नावर उपाय नाही वगैरे तत्त्वज्ञान यावर झाडले जाईलच.

अजित पवारांना त्यांच्या पेहरावातल्या आकस्मिक बदलावर म्हणजेच गुलाबी जॅकेटवर पत्रकारांनी प्रश्न विचारल्यावर त्यांनी ‘मी काय तुमच्या पैशाने कपडे घेतो का?’ असे नेहमीचे आपल्या ‘दादा’ शैलीतले उत्तर दिलेले असले तरी पत्रकारांचा प्रश्न बिनमहत्त्वाचा म्हणता येणार नाही आणि त्याचे उत्तर का टाळले.

# सल्लागार संस्थां’ची सद्दी कुठवर चालणार?

गेले हेही आता उघड झालेच आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) येत्या विधानसभा निवडणूक व्यवस्थापनासाठी नरेश अरोरा यांच्या डिझायनबॉक्सड इनोवेशन या राजकीय सल्लागार संस्थेशी हातमिळवणी करतो अन् अतिशय अपवादात्मक म्हणावे असे राजकारणाला ‘गुलाबी’ हे विशेषण लागते. सांप्रत राजकारणात राजकीय सल्लागार संस्था लपून राहिल्या नाहीत, किंबहुना त्या पडद्याच्या मागेही राहिल्या नाहीत. सर्वच राजकीय पक्षांनी त्यांना स्वीकारले असून एकूण राजकीय प्रक्रियेत देखील त्यांचे सामान्यीकरण झाले आहे. अजित पवारांच्या रूपाने या संस्थांचे नग्न स्वरूप अन् मर्यादा नजरेस पडल्या इतकेच. या राजकीय सल्लागार संस्थांचे आजच्या राजकारणातील स्थान फार मोठे वाटत असेल, पण त्यांच्या मर्यादांचा प्राथमिक आढावा घेणेही आवश्यक आहे... अर्थातच, राजकारणाच्या आखाड्यात अशा



संस्था काही नव्याने उगवल्या नाहीत. १९३० पासून अमेरिकन राजकारणात अशा संस्थांची मुळे सापडतात. भारताच्या राजकारणात देखील त्यांचे अदृश्य अस्तित्व होते; पण लगतच्या काळात, नेमके म्हणायचे झाल्यास २०१४ पासून, तंत्रज्ञानाची सांगड घालत अशा संस्था प्रकर्षाने उभ्या राहिल्या. अशा सल्लागार संस्था नेमके काय करतात तर त्याकरिता अजित पवारांनी कंत्राट दिलेल्या डिझायनबॉक्सड इनोवेशन उदाहरण घेऊया. या संस्थेच्या संकेतस्थळावर ते लिहितात की “आम्ही मतदार वर्तनात दृश्यमान बदल घडवून आणतो”, “राजकीय समर्थनासाठी अनुकूल वातावरण निर्माण करतो”, “विविध मतदार समूहांना नजरेसमोर ठेवून विशिष्ट सामग्री पुरवतो” वगैरे वगैरे. या संस्थांच्या विविध दाव्यांमध्येच त्यांच्या मर्यादा लपल्या आहेत. तंत्रज्ञानाच्या साह्याने अन् प्रचंड डेटा मायनिग करून अशा संस्थांना एक व्यापक राजकारणाची दिशा गवसते जरूर; पण त्याच्या साह्याने अशा संस्था जेव्हा निवडणुकीसारखी महत्त्वाची राजकीय प्रक्रिया हाताळू लागतात तेव्हा एकूण प्रचार यंत्रणेला बाजारपेठेचे स्वरूप येते अन् एकूण प्रचार तुम्हाआम्हाला एखाद्या मालासारखा खपवावा लागतो.म्हणून यातली पहिली मेख ही पारदर्शकता अन् जबाबदारी आहे. एकूण निवडणूक निर्जीव होऊन, एक केंद्रीकृत प्रचार यंत्रणा सामूहिक जनमत घडवू लागते. एरवी विविध चळवळी, नागरी समाज, एनजीओ आदी संस्था काही प्रमाणात राजकीय पक्षांचे सुकाणू, निवडणूक काळात तरी आपल्या हातात ठेवू शकत असत सोपा पर्याय राजकीय पक्षांना उपलब्ध झाला आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# जंगली रमी पे आओ ना महाराज!

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या अन् कृषीमंत्री रमी खेळण्यात व्यस्त

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी एक करण्याची वेळ आली तर आम्ही भाजप श्रेष्ठींना विचारू, असे वक्तव्य नुकतेच राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी केले होते. यावर उत्तर देताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी माणिकराव कोकाटे यांचा एक व्हिडीओ 'एक्स'वर शेअर केला आहे.**



यात माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी गेम खेळत असल्याचे दिसून येत आहे. सत्तेतल्या राष्ट्रवादीला कुठलीही गोष्ट भाजपला विचारल्याशिवाय करता येत नाही. सध्या राज्यात शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासोबतच राज्यात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असून तरीदेखील यांना निर्णय घेता येत नाही. कारण प्रत्येक गोष्ट भाजपला विचारावी लागते. त्यामुळे आता हातात काहीच काम शिल्लक नसल्याने कृषीमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात बसून रमी खेळत असल्याची खोचक टीका रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार यांनी आपल्या एक्स पोस्टमध्ये म्हटले आहे की, जंगली रमी पे आओ ना महाराज! सत्तेतल्या राष्ट्रवादी गटाला भाजपला विचारल्याशिवाय काहीच करता येत नाही. म्हणूनच शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज 8 शेतकरी आत्महत्या करत असताना सुद्धा काही कामच नसल्याने कृषिमंत्र्यांवर रमी खेळण्याची वेळ येत असावी. सत्तेतल्या राष्ट्रवादी गटाला भाजपला विचारल्याशिवाय काहीच करता येत नाही म्हणूनच शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित असताना, राज्यात रोज ८ शेतकरी आत्महत्या करत असताना सुद्धा काही कामच नसल्याने कृषिमंत्र्यांवर रमी खेळण्याची वेळ येत असावी.रस्ता भरकटलेल्या या मंत्र्यांना आणि सरकारला पिकविमा-कर्जमाफी-भावांतराची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांची "कभी गरीब किसानो कीं खेतीपर भी आओ ना महाराज" ही आर्त हाक ऐकू येईल का? असा सवाल त्यांनी उपस्थित केलाय. कधी शेतीवर या महाराज, खेळ थांबा कर्जमाफी द्या, असेही रोहित पवार यांनी म्हटले आहे. दरम्यान, आता यावर माणिकराव कोकाटे काय बोलणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधीमंडळातील रमीचा डाव समाजमाध्यमातून पुढे आल्यानंतर लातूर येथे छावा येथील कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना निवेदन देत त्यांना पत्त्याचा डावही दिला.' आम्ही मंत्र्यांना आमचे प्रश्न मांडण्यासाठी पाठवतो. ते जर पत्ते खेळत असतील तर त्यांना घरी बसवून पत्ते खेळायला हे पत्ते द्या, असे म्हणत कार्यकर्ते संतापले. निवेदन दिल्यानंतर घोषणाबाजी करत परतणाऱ्या या कार्यकर्त्यांच्या अंगावर राष्ट्रवादी कार्यकर्ते गेले. त्यांनी मारहाण केली. त्यामुळे सुनील तटकरे यांच्या पत्रकार बैठकीनंतर मोठा गोंधळ झाला. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीची तयारी करण्यासठी राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे सध्या मराठवाड्यातील विविध जिल्ह्यात भेटी देत आहेत. लातूर येथे पत्रकार बैठकीनंतर छावा संघटनेच्या कार्यकर्त्यांनी सुनील तटकरे यांना निवेदन दिले. मात्र, निवेदन देऊन झाल्यानंतर त्यांनी पत्तेही उधळले. त्यामुळे राष्ट्रवादीचे कार्यकर्तेही चिडले. दोन्ही कार्यकर्त्यांमध्ये मोठी हाणामारी झाली.

### कोकाटे यांचा व्हिडीओ 'एक्स'वर शेअर

'मी काही तुमच्याबरोबर भांडायला आलो नाही. पण राज्याच्या कृषी मंत्र्यांना हे पत्ते द्या आणि त्यांना घरी बसून ते खेळायला सांगा. त्यांना या पदावर राहण्याचा अधिकार नाही असे आमचे मत आहे. राज्याच्या सर्वोच्च सभागृहात कायदे करण्याऐवजी जर पत्ते मंत्री पत्ते खेळत असतील तर त्याची प्रतिक्रिया म्हणून लोकशाही मार्गाने निवेदन देण्यासाठी गेलो होतो, ' असे छावा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विजयकुमार घाडगे म्हणाले. यानंतर राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी छावाच्या कार्यकर्त्यांना मारहाण केली. लाथा, बुक्क्यांनी आणि खुर्च्या उचलून ही हाणामारी करण्यात आली. निवेदन देताना असंसदीय भाषा वापरण्यात आल्याचा आरोप राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. यात माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी गेम खेळत असल्याचे दिसून येत आहे. सत्तेतल्या राष्ट्रवादीला कुठलीही गोष्ट भाजपला विचारल्याशिवाय करता येत नाही.

# स्वयंपूनर्विकास प्रकल्पांना १० टक्के जागा

## चार टक्के व्याज सवलत, स्वयंपूनर्विकास तज्ज्ञ समितीची शिफारस

| मुंबई |
प्रतिनिधी : महाईन्यूज |

**जुन्या मोडळीस आलेल्या किंवा झोपडपट्यांच्या स्वयंपूनर्विकास प्रकल्पांना सध्या मिळणाऱ्या सवलीपेक्षा अधिक सवलती देतानाच सोसायटीतील रहिवाशांना चटईक्षेत्र निर्देशांक किंवा प्रोत्साहन क्षेत्रफळापेक्षा १० टक्के अधिक कारपेट एरिया द्यावा तसेच स्वयंपूनर्विकास प्रकल्पांसाठी एक खिडकी योजना आणि स्वंतत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याची महत्वपूर्ण शिफारस या संदर्भातील तज्ज्ञ समितीने सरकारला केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा अहवाल स्वीकारत त्यावर कृती अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.**



राज्यात विकासकांकडून होणाऱ्या फसवणुकीमुळे अनेक गृहनिर्माण संस्था आपल्या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी टाळाटाळ करतात. त्यातून जुन्या इमारतीं दुर्घटनाग्रस्त होऊन अनेकांना प्राण गमवावे लागल्याच्या घटना शहरी भागात मोठ्याप्रमाणात घडत असतात. यातून मार्ग काढण्यासाठी लोकांनी स्वतःच आपल्या इमारतींचा पुनर्विकास करावा यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने मुंबईत स्वयंपूनर्विकास योजना सुरु केली होती.या योजनेला मुंबई-ठाण्यात चांगला प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत २० इमारतींचा स्वयंपूनर्विकास झाला आहे. त्याची दखल या योजनेतील त्रुटी दूर करुन त्याची राज्यभर व्यापी वाढविण्यासाठी सरकारने आमदार प्रविण दरेकर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना केली होती. या अभ्यास गटाने नुकताच आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला असून सरकारने हा अहवाल स्वीकारला आहे. या अहवालावरील कृती अहवाल लवकरच मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी नगरविकास, गृहनिर्माण विभागांना दिले आहेत.

### स्वयंपूनर्विकासास परवानगी

गृहनिर्माण सोसायटींना वित्त पुरवठा करण्यासाठी सरकारने स्वतंत्र वित्तीय महामंडळ स्थापन करावे, तसेच स्वयंपूनर्विकासासाठी सोसायटीमधील सभासद पुढे यावेत यासाठी त्यांनाही जादा चटईक्षेत्र निर्देशांकासह आणखी काही प्रोत्साहन सवलती देण्याच्या शिफारशीही अभ्यासगटाने केल्या आहेत. स्वयंपूनर्विकासासाठी ३० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक जुन्या इमारती पात्र ठरवाव्यात. तसेच नियोजन प्राधिकरणांनी घोषित केलेल्या धोकादायक इमारती ह्या ३० वर्षापेक्षा कमी असल्या तरी त्यांना स्वयंपूनर्विकाची संधी द्यावी, नैसर्गिक वा मानवनिर्मित आपत्तीमुळे बाधित झालेल्या इमारतींच्या संरचनात्मक परिक्षणात इमारत धोकादायक असल्याचे सिद्ध झाल्यास आणि सबंधित संस्थेने आयआयटी किंवा व्हीजेटीआय यापैकी कोणत्याही एका संस्थेकडून इमारत धोकादायक झाल्याचा अहवाल दिल्यास सबंधित इमारतीच्या स्वयंपूनर्विकासास परवानगी द्यावी.

# बनके कृष्ण, अब किसी को आना होगा!

## जामीन मंजूर करताना न्यायाधीशांनी सादर केली कविता

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दिल्लीतील एका न्यायालयाच्या न्यायाधीशांनी आईच्या मालमत्तेवर बेकायदेशीरपणे ताबा घेतल्याचा आरोप असलेल्या एका व्यक्तीला जामीन मंजूर करताना त्यांच्या निकालाला काव्यात्मक स्पर्श दिला आहे.रोहिणी न्यायालयाचे न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी रोहित कुमार यांनी शुक्रवारी मालमत्तेच्या वादाशी संबंधित एका प्रकरणात नितीन सोनी या व्यक्तीला जामीन मंजूर केला.**



सोनी यांच्यावर असा आरोप आहे की, त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने त्यांच्या आईच्या मालमत्तेचा बेकायदेशीरपणे ताबा घेतला आहे. याबाबत लाइव लॉ ने वृत्त दिले आहे.'जंग मिल्कियत' या शीर्षकाच्या आदेशात स्वतःची कविता वाचताना न्यायाधीश म्हणाले, “मिल्कियत की जंग में ना जाने कितने अफसाने हुए, कुछ ही अपने थे, वो भी अब बेगाने हुए। बनके कृष्ण, अब किसी को आना होगा, लड़ते, लड़ते, बिगड़ते रिश्तों को बचाना होगा। ना जाने ये जंग और कितनी महाभारत लाएगी। आख़िर कितनों को सलाख़ों तक ले जाएगी।”कवितेच्या पुढच्या काही ओळींमध्ये ते म्हणाले, “विरासत की लड़ाई में अनगिनत कहानियाँ सामने आई हैं। जो कुछ अपने थे, वे अब पराये हो गए हैं। इन सड़ते, लड़ते और टूटते रिश्तों को बचाने के लिए अब किसी को आना होगा, जैसे कृष्ण आए थे। कौन जानता है कि यह लड़ाई और कितने महाभारत लाएगी, और कितनों को सलाखों के पीछे ले जाएगी।” या प्रकरणात सोनी यांना १२ जुलै रोजी अटक करण्यात आली होती. दिल्ली पोलिसांनुसार, तक्रारदार असलेल्या त्यांच्या आईच्या नावे असलेल्या वादग्रस्त मालमत्तेचा ताबा घेण्याबाबत न्यायालयाने यापूर्वी निर्देश जारी केले होते, असे लाइव लॉ ने वृत्त दिले आहे. पोलिसांनी न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार, सोनी यांच्याविरुद्ध अनेक पीसीआर कॉल, तक्रारी आणि नॉन-कॉग्निझेबल रिपोर्ट्स दाखल करण्यात आले आहेत. त्यांनी असेही म्हटले आहे की, त्यांच्याविरुद्ध यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती.दरम्यान, यावेळी सोनी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, हा बेकायदेशीर ताब्याचा खटला नाही.

ते म्हणाले की, त्यांच्या आईने तोंडी कराराच्या आधारे स्वेच्छेने मालमत्तेचा ताबा त्याला दिला होता. पुढे असेही सादर करण्यात आले की, सोनी आणि त्याचे कुटुंब १० जुलैपूर्वीपासून वादग्रस्त मालमत्तेत राहत असल्याचे काही फोटो आहेत.

सोनी यांच्यावर असा आरोप आहे की, त्यांनी आणि त्यांच्या पत्नीने त्यांच्या आईच्या मालमत्तेचा बेकायदेशीरपणे ताबा घेतला आहे.

याबाबत लाइव लॉ ने वृत्त दिले आहे.'जंग मिल्कियत' या शीर्षकाच्या आदेशात स्वतःची कविता वाचताना न्यायाधीश म्हणाले, “मिल्कियत की जंग में ना जाने कितने अफसाने हुए, कुछ ही अपने थे, वो भी अब बेगाने हुए। बनके कृष्ण, अब किसी को आना होगा, लड़ते, लड़ते, बिगड़ते रिश्तों को बचाना होगा। ना जाने ये जंग और कितनी महाभारत लाएगी। आख़िर कितनों को सलाख़ों तक ले जाएगी।”कवितेच्या पुढच्या काही ओळींमध्ये ते म्हणाले, “विरासत की लड़ाई में अनगिनत कहानियाँ सामने आई हैं। जो कुछ अपने थे, वे अब पराये हो गए हैं। इन सड़ते, जैसे कृष्ण आए थे। कौन जानता है कि यह लड़ाई और कितने महाभारत लाएगी, और कितनों के सलाखों के पीछे ले जाएगी।” या प्रकरणात सोनी यांना १२ जुलै रोजी अटक करण्यात आली होती.

### स्वेच्छेने मालमत्तेचा ताबा

तक्रारदार असलेल्या त्यांच्या आईच्या नावे असलेल्या वादग्रस्त मालमत्तेचा ताबा घेण्याबाबत न्यायालयाने यापूर्वी निर्देश जारी केले होते, असे लाइव लॉ ने वृत्त दिले आहे.पोलिसांनी न्यायालयाला दिलेल्या माहितीनुसार, सोनी यांच्याविरुद्ध अनेक पीसीआर कॉल, तक्रारी आणि नॉन-कॉग्निझेबल रिपोर्ट्स दाखल करण्यात आले आहेत. त्यांनी असेही म्हटले आहे की, त्यांच्याविरुद्ध यापूर्वी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती.दरम्यान, यावेळी सोनी यांच्या वकिलाने असा युक्तिवाद केला की, हा बेकायदेशीर ताब्याचा खटला नाही. ते म्हणाले की, त्यांच्या आईने तोंडी कराराच्या आधारे स्वेच्छेने मालमत्तेचा ताबा त्याला दिला होता. पुढे असेही सादर करण्यात आले की, सोनी आणि त्याचे कुटुंब १० जुलैपूर्वीपासून वादग्रस्त मालमत्तेत राहत असल्याचे काही फोटो आहेत.

# दोन सख्ख्या भावांचा एकाच मुलीशी विवाह

## कोणत्याही दबावाविना हे लग्न केल्याची प्रतिक्रिया नेगी बंधूंनी दिली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**हिमाचल प्रदेशात एक अनोखा विवाह सोहळा पार पडला आहे. येथील दोन सख्ख्या भावांनी एकाच महिलेशी लग्न केले आहे. सिरमौर जिल्ह्यातील शिलाई गावात शेकडो वऱ्हाड्यांच्या उपस्थितीत हे लग्न पार पडले होते. हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडच्या पर्वतरांगामध्ये आजही बहुपत्नीत्वाची प्रथा पाळली जाते. त्याच प्रथेनुसार हे लग्न पार पडल्याचे सांगितले जाते.**





प्रदीप आणि कपिल नेगी या दोन भावंडांनी सुनीता चौहानशी लग्न केले आहे. परस्पर संमतीने आणि कोणत्याही दबावाविना हे लग्न केल्याची प्रतिक्रिया नेगी बंधूंनी दिली. तसेच आम्हाला याचा अभिमान असल्याचेही ते म्हणाले. आमची परंपरा पुढे नेण्याचा हा आमचा संयुक्त निर्णय होता, असेही दोघे भाऊ म्हणाले.१२ जुलै रोजी या लग्नाला सुरुवात झाली. तब्बल तीन दिवस लग्नाच्या विधी सुरू होत्या. यासाठी शेकडो नातेवाईकांनी लग्नाला उपस्थिती लावली. स्थानिक लोकगीते, नृत्ये सादर करत लोकांनी या समारंभात सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे काही व्हिडीओही सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. याच जिल्ह्यातील कुन्हाट गावातील रहिवासी असलेल्या सुनीता चौहान म्हणाल्या की, त्यांना या परंपरेची जाणीव होती. तिने स्वतःच्या इच्छेने हे लग्न केले.

हिमाचल प्रदेशमधील महसूल कायद्यांनुसार अशा लग्नांना 'जोडीदारां' या शब्दाखाली मान्यता दिली जाते. जिल्ह्यातील बढाना गावात याच पद्धतीने गेल्या सहा वर्षांत पाच लग्न झालेली आहेत, असे वृत्त पीटीआयने दिलेले आहे. २०२२ मध्ये हत्ती समुदायाला अनुसूचित जमातीचा दर्जा मिळाला आहे. हा समुदाय हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड सीमेवरील पर्वतरांगामध्ये राहतो.वाढती साक्षरता, सामाजिक बदल आणि आर्थिक विकासामुळे गेल्या काही वर्षांत या प्रथेचे प्रमाण कमी झाले असले तरी आजही या प्रदेशात ही प्रथा अस्तित्वात आहे.

### हट्टी समाजाची लोकसंख्या किती?

हिंदुस्तान टाइम्सने दिलेल्या बातमीनुसार, सध्या अशा लग्नाचे प्रमाण कमी झाले असले तरी अधिक गाजावाजा न करता काही भागात गुपचूप अशी लग्न होत आहेत.हिमाचल आणि उत्तराखंडच्या सीमेवर असलेल्या ट्रान्स-गिरी प्रदेशातील सुमारे ४५० गावांमध्ये हट्टी समुदायाचे अंदाजे तीन लाख लोक आहेत. उत्तराखंडच्या जौनसर बाबर आणि हिमाचल प्रदेशातील किन्नौर यासारख्या शेजारच्या आदिवासी भागातही अशाच परंपरा पाळल्या जात होत्या.केंद्रीय हट्टी समितीचे सरचिटणीस कुंदन सिंह शास्त्री म्हणाले की, दुर्गम डोंगराळ प्रदेशात सामाजिक-आर्थिक परिस्थिती हाताळण्यासाठी हजारो वर्षांपासून ही प्रथा विकसित झाली. जर कुटुंब मोठे असेल आणि त्यात जास्त पुरुष असतील तर आदिवासी समुदायात राहताना सुरक्षेचे वातावरण तयार होते.

# मिस्टर अँड मिसेस देवमाणूस



किरण गायकवाड मराठी मालिकाविश्वातील लोकप्रिय अभिनेता आहे. सध्या तो 'झी मराठी'वरील 'देवमाणूस' या मालिकेत मुख्य भूमिका साकारत आहे. त्याच्या या मालिकेचा मोठा चाहतावर्ग असल्याचं पाहायला मिळतं. अशातच आता किरणची बायको अभिनेत्री वैष्णवी कल्याणकर हिने एक पोस्ट शेअर केली आहे. वैष्णवीने सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली असून त्याला खास कॅप्शन दिलं आहे. तिच्या या कॅप्शनने अनेकांचं लक्ष वेधलं आहे. वैष्णवीने यावेळी तिचा नवरा किरणबरोबरचे दोन फोटो शेअर केले आहेत. यामध्ये किरण दाक्षिणात्य लूकमध्ये पाहायला मिळत आहे, तर वैष्णवीनेसुद्धा साडी नेसली असून दोघे एकमेकांसह पोज देताना फोटो काढत असल्याचं या पोस्टमधून दिसतं.वैष्णवीने या फोटोंना, "मिस्टर अँड मिसेस देवमाणूस असंच ना?" असं हटके कॅप्शन दिलं आहे. तिने हटके कॅप्शन दिलेल्या या पोस्टखाली दोघांच्या चाहत्यांनी कमेंट केलेल्या पाहायला मिळतं. यावेळी एका नेटकऱ्याने, "देवमाणूसने बना दी जोडी", दुसऱ्याने, "तुमची जोडी फार छान आहे", "नजर ना लागो कोणाची जगदंब", "डॉ साहेब आणि वहिनी" अशा कमेंट्स केल्या आहेत.किरण गायकवाड सध्या 'देवमाणूस' मालिकेमुळे खूप चर्चेत आहे. त्याच्या या मालिकेचा मोठा चाहतावर्ग असल्याचं पाहायला मिळतं. यापूर्वी 'देवमाणूस'च्या दोन्ही भागांनासुद्धा प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

# कोण आहे अनीत पड्डा ?



'सैयारा' चित्रपटातून दोन नवीन चेहरे इंडस्ट्रीत दाखल झाले आहेत – अहान पांडे आणि अनित पड्डा. दोघांच्याही पदार्पणामुळे सध्या बरीच चर्चा रंगत आहे. अशा परिस्थितीत लोकांना हे दोघे कोण आहेत हे जाणून घ्यायचे आहे? अहान पांडे हा अनन्या पांडेचा चुलत भाऊ म्हणजेच चंकी पांडेचा पुतण्या आहे. पण, जर तुम्हाला आतापर्यंत अनित पड्डाबद्दल माहिती मिळाली नसेल तर आम्ही तुम्हाला सांगतो. अनित पड्डाचा जन्म १४ ऑक्टोबर २००२ रोजी पंजाबमध्ये झाला. ती एका लहान शहरातून येते. अमृतसरमधील स्प्रिंग डेल सीनियर स्कूलमधून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, अनितने दिल्ली विद्यापीठातून राज्यशास्त्रात पदवी प्राप्त केली. तिची आवड नेहमीच अभिनयाकडे होती आणि तिने तिच्या कारकिर्दीची सुरुवात मॉडेलिंगद्वारे केली.मोहित सुरी दिग्दर्शित 'सैयारा' हा अनित पड्डाचा बॉलीवूडमधील पहिलाच मोठा चित्रपट आहे, ज्यामध्ये ती मुख्य भूमिका साकारत आहे. या चित्रपटातील तिच्या अभिनयाला आतापर्यंत सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. हा चित्रपट एक रोमँटिक ड्रामा आहे, जो यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली चित्रित करण्यात आला आहे. चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच अनित आणि अहानच्या जोडीबद्दल बरीच उत्सुकता होती आणि आता हा चित्रपट प्रदर्शित झाला आहे. तो बॉक्स ऑफिसवर धमाल करत आहे.अनितने २०२२ मध्ये काजोल आणि विशाल जेठवा यांच्याबरोबर 'सलाम वेंकी' या चित्रपटातून पदार्पण केले, जिथे तिने नंदिनीची भूमिका साकारली होती. त्यानंतर तिने नित्या मेहराच्या 'बिग गर्ल्स डोन्ट क्राय' या वेब सीरिजमध्येही काम केले, जिथे तिची भूमिका रुही आहुजा होती. या दोन्ही प्रोजेक्टमध्ये अनितची भूमिका फारशी नव्हती, पण तिने निश्चितच तिची छाप सोडली.'सैयारा' बातम्यांमध्ये येण्यापूर्वी, अनितचे इन्स्टाग्रामवर सुमारे ३७ हजार फॉलोअर्स होते. पण, आता चित्रपट प्रदर्शित झाला आहे आणि दोन्ही कलाकारांना प्रेक्षकांकडून प्रेम मिळत आहे, त्यामुळे सध्या तिचे सुमारे २.५ लाख फॉलोअर्स आहेत. अनित अनेकदा तिच्या शूटिंग आणि चित्रपटांशी संबंधित पोस्ट सोशल मीडियावर शेअर करते. तिचे अनेक बोल्ड आणि ग्लॅमरस फोटो आतापर्यंत सोशल मीडियावर लाईक झाले आहेत.अनित पड्डाची आवड केवळ अभिनयापुरती मर्यादित नाही. तिला संगीताचीही खूप आवड आहे आणि ती अनेक वेळा गाताना दिसली आहे. याशिवाय, अनितने अनेक आघाडीच्या ब्रँड्सबरोबर जाहिरातींमध्येही काम केले आहे.'सैयारा' चित्रपटातून दोन नवीन चेहरे इंडस्ट्रीत दाखल झाले आहेत – अहान पांडे आणि अनित पड्डा. दोघांच्याही पदार्पणामुळे सध्या बरीच चर्चा रंगत आहे. अशा परिस्थितीत लोकांना हे दोघे कोण आहेत हे जाणून घ्यायचे आहे? अहान पांडे हा अनन्या पांडेचा चुलत भाऊ म्हणजेच चंकी पांडेचा पुतण्या आहे. पण, जर तुम्हाला आतापर्यंत अनित पड्डाबद्दल माहिती मिळाली नसेल तर आम्ही तुम्हाला सांगतो. अनित पड्डाचा जन्म १४ ऑक्टोबर २००२ रोजी पंजाबमध्ये झाला. ती एका लहान शहरातून येते.

'तारक मेहता का उल्टा चश्मा' ही लोकप्रिय मालिका गेल्या १७ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या विनोदी कार्यक्रमाचा आणि यामध्ये काम करणाऱ्या कलाकारांचा मोठा चाहतावर्ग आहे.या मालिकेतील जेठालाल, भिडे मास्तर, माधवी भाभी, अय्यर, बबीताजी, पोपटलाल याबरोबरच टप्पू सेना अशी सगळीच पात्रे लोकप्रिय ठरली आहेत. असे असले तरी आतापर्यंत अनेक कलाकारांनी मालिका सोडल्याचे पाहायला मिळाले. आता अभिनेत्री निधी भानुशाली तिच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आली आहे. अभिनेत्री तारक मेहता का उल्टा चश्मा मालिकेत सोनू ही भूमिका साकारली होती.आता अभिनेत्रीने सात वर्षे मालिकेत काम केल्यानंतर मालिका का सोडली यावर वक्तव्य केले आहे. न्यूज १८ ला नुकतीच तिने मुलाखत दिली. या मुलाखतीत निधी म्हणाली की सात वर्षे मालिकेत केल्यानंतर ती मालिका सोडण्याचा निर्णय घाईघाईत घेतला नव्हता. मला त्यावेळी वाटले की तो शो सोडण्याची ती योग्य वेळ आहे. कारण मला इतर गोष्टीही करायच्या होत्या.या शोमध्ये काम करणे हा माझ्या आयुष्यातील सर्वात समृद्ध अनुभवांपैकी एक होता. परंतु मला इतर बऱ्याच गोष्टी करायच्या होत्या.ब मला अधिक अभ्यास करायचा होता, प्रवास करायचा होता आणि जीवनाचा अनुभव अशा प्रकारे घ्यायचा होता. पण १२ तासांच्या शूटिंगमुळे हे सगळं शक्य होत नाही." जर निर्मात्यांनी तिला परत येण्यासाठी संपर्क साधला तर ती पुन्हा मालिकेत काम करेल का? यावर अभिनेत्री म्हणाली, "जर मी पुन्हा ती भूमिका साकारण्याचा निर्णय घेतला तर ज्या कारणासाठी मी मालिका सोडली होती, तो उद्देश मागे राहील. एका पात्राच्या चौकटीबाहेर स्वतःला शोधण्याची तीव्र इच्छा माझ्या मनात होती. माझ्या मनात शोबद्दल खूप प्रेम आणि कृतज्ञता आहे. पण, आता मला वेगळ्या गोष्टींचा अनुभव घ्यायचा आहे."निधी असेही म्हणाली की तिने जरी मालिका सोडली असली तरी मालिकेतील कलाकारांबरोबर तिचे आजही चांगले बॉण्डिंग आहे. ती वेळ मिळेल तसा इतर कलाकारांना भेटण्याचा प्रयत्न करते. दरम्यान, निधीने चित्रपट, टेलिव्हिजन आणि न्यू मीडिया प्रॉडक्शनमध्ये बॅचलर पदवी पूर्ण केली आहे. तसेच अभिनयाबरोबर तिला संगीताचीदेखील आवड आहे.'तारक मेहता का उल्टा चश्मा' ही लोकप्रिय मालिका गेल्या १७ वर्षांपासून प्रेक्षकांचे मनोरंजन करत आहे. या विनोदी कार्यक्रमाचा आणि यामध्ये काम करणाऱ्या कलाकारांचा मोठा चाहतावर्ग आहे.या मालिकेतील

# 'तारक मेहता का उल्टा चश्मा' फेम 'ही' अभिनेत्री पुन्हा परतणार?

# चौथ्या कसोटीतून आकाशदीप बाहेर!

## कंबोजचा भारतीय संघात करण्यात आला समावेश

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मँचेस्टरमध्ये भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये चौथ्या कसोटी सामन्याचा थरार रंगणार आहे. या सामन्याला २३ जुलैपासून सुरूवात होणार आहे. मालिकेच्या दृष्टीने हा सामना भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा असणार आहे. कारण हा सामना गमावला, तर भारतीय संघ मालिका जिंकणार नाही. त्यामुळे भारतीय संघ या सामन्यात पूर्ण ताकदीने उतरू शकतो. चौथ्या सामन्यासाठी भारतीय संघाच्या प्लेइंग ११ मध्ये मोठा बदल पाहायला मिळू शकतो.**




या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली,त्यावेळीच जसप्रीत बुमराहच्या खेळण्याबाबत मोठी अपडेट देण्यात आली होती. कामाच्या ताणाचे व्यवस्थापन करण्यासाठी तो मालिकेतील ५ पैकी ३ सामने खेळणार, तर २ सामन्यात त्याला विश्रांती दिली जाणार असल्याचं आधीपासून ठरलं आहे. त्यामुळे पहिला सामना खेळल्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्याला विश्रांती देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा तिसऱ्या सामन्यात त्याने पुनरागमन केलं. आता चौथ्या सामन्यात विश्रांती करून तो पाचव्या कसोटीत पुनरागमन करणार, अशी चर्चा रंगली होती. पण पुढील सामना भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे तो चौथ्या सामन्यात खेळणार असल्याची माहिती समोर येत आहे.या सामन्यासाठी एके ४७ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या २४ वर्षीय अंशुल कंबोजचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. त्याला मँचेस्टर कसोटीत पदार्पण करण्याची संधी दिली जाऊ शकते.

टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, आकाशदीपला चौथ्या कसोटीत विश्रांती दिली जाऊ शकते. त्याच्या जागी अंशुल कंबोजला कसोटी पदार्पण करण्याची संधी मिळणार आहे. आकाशदीपने मालिकेतील तिसऱ्या सामन्यात महत्वाचे गडी बाद करून दिले होते. मात्र त्याला दुखापतीमुळे मैदान सोडून जावं लागलं होतं. त्यानंतर पुन्हा तो मैदानात परतला होता. मात्र, त्याची दुखापत पाहता त्याला प्लेइंग ११ मध्ये खेळायला मिळण्याची शक्यता खूप कमी आहे.या निर्णायक सामन्याआधी भारतीय संघाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. भारताचा डावखुऱ्या हाताचा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग दुखापतीमुळे चौथ्या सामन्यातून बाहेर पडला आहे. या सामन्याआधी सराव करत असताना साई सुदर्शनने मारलेला चेंडू हा अर्शदीपच्या हाताला लागला. त्यामुळे हाताला टाके लावण्यात आले आहेत. याच कारणास्तव तो चौथ्या कसोटीतून बाहेर पडला आहे. त्याचा बदली खेळाडू म्हणून अंशुल कंबोजला संघात स्थान दिलं गेलं आहे.या मालिकेसाठी भारतीय संघाची घोषणा झाली,त्यावेळीच जसप्रीत बुमराहच्या खेळण्याबाबत मोठी अपडेट देण्यात आली होती. कामाच्या ताणाचे व्यवस्थापन करण्यासाठी तो मालिकेतील ५ पैकी ३ सामने खेळणार, तर २ सामन्यात त्याला विश्रांती दिली जाणार असल्याचं आधीपासून ठरलं आहे. त्यामुळे पहिला सामना खेळल्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्याला विश्रांती देण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा तिसऱ्या सामन्यात त्याने पुनरागमन केलं. आता चौथ्या सामन्यात विश्रांती करून तो पाचव्या कसोटीत पुनरागमन करणार, अशी चर्चा रंगली होती. पण पुढील सामना भारतीय संघासाठी अतिशय महत्वाचा आहे. त्यामुळे तो चौथ्या सामन्यात खेळणार असल्याची माहिती समोर येत आहे.

### बुमराहला विश्रांती दिली जाणार

या सामन्यासाठी एके ४७ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या २४ वर्षीय अंशुल कंबोजचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. त्याला मँचेस्टर कसोटीत पदार्पण करण्याची संधी दिली जाऊ शकते. टाइम्स ऑफ इंडियाने दिलेल्या वृत्तानुसार, आकाशदीपला चौथ्या कसोटीत विश्रांती दिली जाऊ शकते. त्याच्या जागी अंशुल कंबोजला कसोटी पदार्पण करण्याची संधी मिळणार आहे. आकाशदीपने मालिकेतील तिसऱ्या सामन्यात महत्वाचे गडी बाद करून दिले होते. मात्र त्याला दुखापतीमुळे मैदान सोडून जावं लागलं होतं. त्यानंतर पुन्हा तो मैदानात परतला होता. मात्र, त्याची दुखापत पाहता त्याला प्लेइंग ११ मध्ये खेळायला मिळण्याची शक्यता खूप कमी आहे.या निर्णायक सामन्याआधी भारतीय संघाला आणखी एक मोठा धक्का बसला आहे. या सामन्याआधी सराव करत असताना साई सुदर्शनने मारलेला चेंडू हा अर्शदीपच्या हाताला लागला. त्यामुळे हाताला टाके लावण्यात आले आहेत.

---

# बीसीसीआयने 'हा' बदल करायलाच हवा!

## हरभजन सिंगची बीसीसीआयकडे गौतम गंभीरसाठी खास मागणी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शुबमन गिलच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ सध्या इंग्लंड दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये ५ कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेत भारतीय संघ २- १ ने पिछाडीवर आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यात भारतीय संघाने विजय मिळवला होता. तर पहिल्या आणि तिसऱ्या सामन्यात पराभवाचा सामना करावा लागला आहे.**





भारतीय संघाची जबाबदारी गौतम गंभीरच्या हाती सोपवण्यात आली आहे. गंभीरच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाला कसोटी क्रिकेटमध्ये हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. त्यामुळे त्याच्या नेतृत्वावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली खेळताना भारतीय संघाने वेस्ट इंडिजमध्ये टी -२० वर्ल्डकप स्पर्धा जिंकली होती. या स्पर्धेनंतर राहुल द्रविड यांचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ संपला. त्यानंतर गौतम गंभीरची मुख्य प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली. गंभीरच्या मार्गदर्शनाखाली भारताने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धा जिंकली.

### आता प्रत्येक फॉरमॅटसाठी वेगळा संघ

पण मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध आणि ऑस्ट्रेलियामध्ये कसोटी मालिका गमावली. त्यामुळे हरभजन सिंगने बीसीसीआयला कसोटी क्रिकेटसाठी वेगळा आणि वनडे, टी -२० साठी वेगवेगळा मुख्य प्रशिक्षक निवडण्याचा सल्ला दिला आहे.हरभजन सिंग म्हणाला, "जर हा नियम लागू केला गेला तर यात काहीच चुकीचं नसेल. आता प्रत्येक फॉरमॅटसाठी वेगळा संघ आणि वेगळे खेळाडू असतात. मग वेगळा मुख्य प्रशिक्षक असायला काहीच हरकत नाही. त्यामुळे मुख्य प्रशिक्षकावर असलेल्या कामाचा ताण कमी होईल. हे झालं तर बरंच होईल." तसेच तो पुढे म्हणाला, " मुख्य प्रशिक्षकालाही एखाद्या दौऱ्यावर जाण्यासाठी वेळ हवा असतो. कधी ऑस्ट्रेलिया तर कधी इंग्लंड. त्यामुळे प्रशिक्षकाला विचार करण्यासाठी पुरेसा वेळ मिळेल की, त्याला संघ कसा करायचा आहे. हीच गोष्ट मर्यादित षटकांच्या मुख्य प्रशिक्षकासाठीही लागू होईल. त्यालाही संघ बांधणीसाठी विचार करायला पुरेसा वेळ मिळेल."

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। सोमवार ।
। दि. 21 जुलै 2025।


पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy**
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India | SPPU Affiliation | NAAC Accreditation | Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your Application Now!



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)

Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

KES'S PRATIBHA GROUP OF INSTITUTES'

# PRATIBHA COLLEGE OF COMMERCE & COMPUTER STUDIES

Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN FOR THE YEAR 2025-26

UG & PG Courses in Arts, Commerce, Science, Computer Science & Management

B.A. English/ Economics/ Psychology
B.Com. Regular
B.Com. Business Management
B.Com. International Business
B.Com. Computer Application
B.Sc. Chemistry
B.Sc. Statistics
B.Sc. Cyber Security
B.Sc. Computer Science
B.Sc. Computer Application
B.Sc. Data Science
B.Sc. Information Technology
M.Com
B.Sc. Cyber & Digital Sci.
B.Sc. Nano Sci. & Nano Tech.
B.Sc. AI & Machine Learning
PH.D. Commerce & Management
M.Sc. Cyber Security
M.Sc. Data Science
M.Sc. Computer Science
M.Sc. Computer Application
M.Sc. Statistics/ Organic Chemistry
M.A. English/ Psychology
PH.D. English

Eligibility: For Under Graduation : Passed 12th (HSC) | For Post Graduation: Graduation in respective field

For Admission Enquiry Call : 8600189162, Timings: 9 am to 5 pm

Campus: Block D-III, Plot No. 3, Behind Mehta Hospital, Old Mumbai Pune Highway, Kalbhor Nagar, Chinchwad, Pune 19
For more details please visit us at: www.pcccs.org.in

# अधिवेशनात आमदार जगताप यांची दमदार कामगिरी!

## पिंपरी-चिंचवडच्या विविध प्रश्नांबरोबरच पत्रकार कल्याण महामंडळाची मागणी चर्चेत




। पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी । महाईन्यूज

**महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी विविध लोकहिताचे विषय लावून धरत प्रभावी उपस्थिती नोंदवली. पंधरा बैठकींसाठी शंभर टक्के उपस्थित राहणाऱ्या मोजक्या आमदारांपैकी ते एक होते. प्रश्न विचारण्यापासून विधेयकांवरील चर्चेपर्यंत आणि ठोस सूचनांपासून औचित्याच्या मुद्द्यांपर्यंत त्यांनी दमदार कामगिरी बजावली.**

### पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळाची आग्रही मागणी

लक्षवेधी सूचना क्रमांक २४७३ अंतर्गत त्यांनी राज्यातील पत्रकारांच्या हितासाठी 'आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार कल्याण महामंडळ' स्थापन करण्याची मागणी विधानसभेत स्पष्ट शब्दांत मांडली. या मागणीत आरोग्य विमा, अपघात विमा, शिष्यवृत्ती, किमान वेतन, निवृत्ती वेतन यासारख्या सुविधा सर्व पत्रकारांना मिळाव्यात यावर त्यांनी भर दिला.

### मतदारसंघातील प्रश्नांवर विशेष लक्ष

जगताप यांनी विचारलेले ११ तारांकित प्रश्न आणि १० लक्षवेधी सूचना प्रामुख्याने पिंपरी-चिंचवड परिसरातील गंभीर प्रश्नांशी निगडित होत्या. यातून स्थानिक प्रश्नांना विधानसभेत स्थान मिळाल्याचे उदाहरण दिसते.

### प्रमुख लक्षवेधी सूचना:

1. पिंपरी-चिंचवड डीपीतील बेकायदेशीर रस्त्यांची आरक्षणे रद्द करणे
2. हिंजवडी आयटी पार्क परिसरातील वाहतूक समस्या
3. मालेगावमध्ये ५००च्या बनावट नोटांशी संबंधित गुन्हेगारी कारवाई
4. पत्रकार कल्याण महामंडळाची गरज

### उल्लेखनीय तारांकित प्रश्न:

मुळा नदीपात्रातून बेकायदेशीर वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कडक कारवाई
* अन्नधान्य वितरण कार्यालयातील गैरकारभार
* धर्मादाय रुग्णालयातील सवलतींच्या योजनेची ऑनलाईन अंमलबजावणी
* अन्न व औषध प्रशासन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत
* बनावट पॅथॉलॉजी लॅब्सवर कारवाई आणि दर नियंत्रण कायदा
* शिक्षण विभागातील अपात्र शिक्षकांच्या वेतन घोटाळ्याची S.I.T. चौकशी
* ओला-उबेरसारख्या सेवा कंपन्यांच्या नियंत्रणासाठी समिती नेमणूक
* ST महामंडळातील जाहिरात परवान्यांमधील गैरव्यवहार

### औचित्याचे मुद्दे: स्थानिक व राज्यस्तरीय प्रश्नांवर ठाम भूमिका

जगताप यांनी दोन महत्त्वाचे औचित्याचे मुद्दे विधानसभेत उपस्थित केले:
1. पीसीएनटीडीएच्या आरक्षित जागांवरील ताबेदार नागरिकांना सातबारा व प्रॉपर्टी कार्ड देणे
2. गोवंश हत्या व गोमांस वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाईची मागणी

जगताप यांनी पुढील पाच विषयांवर अर्धातास चर्चेसाठी मांडून सरकारचे लक्ष वेधले, मात्र बॅलेटमध्ये न आल्यामुळे चर्चा झाली नाही :

* डीपी आराखड्यातील बेकायदेशीर आरक्षणे रद्द करणे
* पवना, मुळा, इंद्रायणी नदी स्वच्छता व प्रदूषणमुक्ती
* PMPMLच्या समस्यांचे निराकरण
* मुंबई एक्सप्रेस हायवेवरील अपघात नियंत्रण
* पिंपरी-चिंचवडच्या वाढत्या नागरीकरणासाठी पायाभूत सुविधा विस्तार

### विधेयकांवरील प्रभावी चर्चा

१. महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सुधारणा
जगताप यांनी कोयता गँग, वाहनांच्या काचा फोडणारी टोळकी, अमलीपदार्थ उत्पादक व विक्रेते, दूध व अन्न भेसळ करणारे माफिया यांना MCOCA अंतर्गत आणण्याची मागणी केली.

### 2.झोपडपट्टी पुनर्विकास विधेयक 2025

झोपडपट्ट्यांमध्ये नियमबाह्य TDR ची काळी बाजारपेठ रोखण्यासाठी पारदर्शी आणि कठोर कायदा व्हावा, असे स्पष्ट मत मांडले.

### मुख्यमंत्र्यांशी थेट चर्चा

हिंजवडीसह सात गावांचा महापालिकेत समावेश, वाहतूक कोंडी, अतिक्रमण, पूरस्थिती आदी विषयांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत बैठक घेतली. काळेवाडीतील बेकायदेशीर चर्चवर कारवाई व धर्मांतर विरोधी उपाययोजनांबाबतही मुद्दा मांडला.

### विधान सभा समित्यांच्या कामकाजात सहभाग

जगताप यांनी अशासकीय विधेयक व ठरावांबाबतच्या समित्यांमध्ये सक्रीय सहभाग नोंदवला. कामकाज क्रम ठरवण्याच्या बैठकीतही उपस्थित राहून कामगिरी बजावली.

### राज्याच्या प्रगतीशी संबंधित मुद्द्यांवर स्पष्ट मत

* शेतकऱ्यांसाठी हरित ऊर्जा पुरवठा योजना
* गुन्हेगारी नियंत्रणासाठी सायबर सुरक्षा आणि नार्कोटिक्स सेल स्थापन
* डिजिटल भारताच्या दिशेने ५० सायबर लॅब्स आणि हेल्पलाइन क्रमांक सुरू
* नव्या शिक्षण धोरणांतर्गत नवी मुंबईत ५ आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे प्रकल्प

### लोकशाही मूल्यांचे जतन

जनसुरक्षा कायद्याबाबत बोलताना, त्यांनी व्यक्तीस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी कायद्याने पुराव्यांची अट ठेवली जाणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.

प्रभावी, अभ्यासू आणि परिणामकारक आमदार

आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात केवळ प्रश्न विचारले नाहीत, तर ते स्थानीय आणि राज्यस्तरीय प्रश्नांवर सुसंगत, ठोस आणि व्यापक भूमिका घेऊन उभे राहिले. पत्रकार, कामगार, शिक्षक, रुग्ण, वाहतूकपीडित, झोपडीधारक, शेतकरी, महिला, विद्यार्थी अशा सर्व घटकांसाठी त्यांची लढाई दिसून आली. त्यांच्या या अभ्यासपूर्ण आणि जिव्हाळ्याच्या कामगिरीमुळे चिंचवडकरांचा आवाज विधानभवनात ठामपणे पोहचला

खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधी म्हणजे केवळ उपस्थित राहणारा नव्हे, तर लोकांचे प्रश्न धैर्याने मांडणारा असतो आणि आमदार शंकर जगताप यांनी याचे वस्तुपाठ दाखवले आहेत.

पत्रकार परिषदेस माजी महापौर उषा तथा माई ढोरे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, प्रदेश सदस्य संतोष कलाटे, माजी नगरसेविका उषा मुंडे, शारदा सोनवणे, अश्विनी चिंचवडे, संगीता भोंडवे, निर्मला कुटे, आरती चोंधे, माजी नगरसेवक सुरेश भोईर, अभिषेक बारणे, सिद्धेश्वर बारणे, राजेंद्र गावडे, सागर आंगोळकर, बाबासाहेब त्रिभुवन, संदीप कस्पटे, संतोष कांबळे, संदीप गाडे, विठ्ठल भोईर, बिभीषण चौधरी, महेश जगताप, काळूराम नढे, तानाजी बारणे, भाजप मंडलाध्यक्ष गणेश ढोरे, सनी बारणे, मोहन राऊत, हर्षल नढे, सोमनाथ तापकीर, मंडलाध्यक्षा पियुषा पाटील, रामदास कस्पटे, अतुल पाटील, नरेंद्र माने, दीपक भोंडवे, सोमनाथ भोंडवे, प्रसाद कस्पटे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.